**<u>पुढील उलटपास प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ तर्फे वकील श्री. बी.एन.प्रभु यांचे मार्फत</u>**

११. दावा मिळकतीसंदर्भातील १९५६—१९५७ ते १९७५—१९७६ चा सातबारा आजरोजी सादर केलेली नक्कल स्विकारण्यापूर्वी पाहिलेला होता. १९५६—१९५७ ते १९७५—१९७६ या कालावधीतील दावा मिळकतीच्या सातबाराची नक्कल मी यापूर्वी पाहिलेली आहे. माझे आजोबांचे पुर्ण नाव बाळकृष्ण महादेव येसजी असे होते. (<u>साक्षीदाराला निशाण २२१ वरील सातबारा दाखविण्यात आला.</u>)

प्रश्न— या सातबारा मध्ये बाळकृष्ण महादेव येसजी असे इतर हक्क रकान्यात लिहीलेले आहे तेथे महादेव याचेवर खाट मारलेली आहे?

उत्तर— काक पाद चिन्हाचा उपयोग करुन वडिलांच्या नावाचे नोंद केली व त्यामुळे महादेव या शब्दावर खाट मारली आहे.

१२. प्रश्न— तुमच्या म्हणण्याप्रमाणे काक पाद चिन्हाचा उपयोग करुन वडिलांच्या नावाची नोंद केली व त्यामुळे महादेव या शब्दावर खाट मारली आहे असे जर असेल तर बाळकृष्ण महादेव येसजी असे नाव लागले की गोविंद बाळकृष्ण येसजी असे नाव लागले?

उत्तर— प्रथम बाळकृष्ण महादेव येसजी हे माझे आजोबा यांचे नाव लागले. त्यानंतर माझे वडिल गोविंद बाळकृष्ण येसजी असे नाव लागले. त्यांचे मृत्युपश्चात त्यांच्या वारसांची नावे लागलेली आहेत.

१३. प्रश्न— तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुमच्या वडिलांचे म्हणजे गोविंद बाळकृष्ण येसजी यांचे नाव कोणत्या फेरफाराने लागले?

उत्तर— तो फेरफार माझे आता स्मरणार्थ नाही.

१४. गाव दत्परी माझे वडिलांचे नाव आजोबांचे पश्चात लागण्यासंदर्भात फेरफाराची नोंद झाली होती असे माझे माहितीत नाही.

प्रश्न— आजोबांच्या पश्चात वडिलांचे नाव फेरफार नोंदीव्दारे लागले असे दर्शविणारा कोणता कागदोपत्री पुरावा तुमच्याकडे आहे का?

उत्तर— माझेकडे आज जो निशाण २२१ येथे जो सातबारा आहे तो त्याबाबतचा कागदोपत्री

पुरावा आहे.

हे म्हणणे खरे नाही बाळकृष्ण महादेव येसजी यांचे पश्चात गोविंद बाळकृष्ण येसजी यांचे नाव मयताचा वारस म्हणुन नोंदविण्याबाबत कोणतीही फेरफार नोंद करण्यात आलेला नाही. बाळकृष्ण महादेव येसजी यांचे पश्चात गोविंद बाळकृष्ण येसजी यांचे नाव वारस म्हणुन नोंद झालेचे दाखविण्याबाबत मी फेरफार नोंद हजर करु शकतो.

१५. हे म्हणणे खरे नाही की बाळकृष्ण महादव येसजी यांचे पश्चात गोविंद बाळकृष्ण येसजी यांचे नाव नोंदले न गेल्यामुळे आमचे देखील नाव गोविंद यांचे पश्चात नोंदविण्यात आले ते बेकायदेशीर आहे. बाळकृष्ण महादेव येसजी यांचे पश्चात गोविंद बाळकृष्ण येसजी यांचे नाव लागल्या संदर्भाचा फेरफार मी आजमितीपर्यंत महसुल अधिका—यांकडून मागवुन घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की बाळकृष्ण महादेव येसजी अशी नोंद सातबारा पत्रकी कधीही झालेली नाही.

१६. श्री देव वेताबा देवस्थान आरवली हा सार्वजनिक नोंदणीकृत न्यास आहे याची मला माहिती आहे.

प्रश्न— न्यायालयीन कार्यवाहीसाठी कोणत्याही गरजुला मदत करणे हे वेतोबा देवस्थानचे न्यासाचे उद्दिष्ट नाही?

उत्तर— गरज असल्यास न्यास तशी मदत करु शकते.

श्री देव वेताबा देवस्थान आरवली या न्यासाची घटना माझे वाचनात कधी आलेली नाही. सदर घटनेसंदर्भात त्या देवस्थानाच्या न्यासाचे आजी माजी विश्वस्त यांच्याकडून मी माहिती घेतलेली नाही कारण मला तशी गरज वाटलेली नाही. प्रतिवादी विरुध्द कारवाई करण्यासाठी मी सदर देवस्थानाच्या न्यासाकडून आर्थिक सहाय्यासाठी अर्ज करुन मागणी केली होती. त्याप्रमाणे माझा अर्ज देवस्थानाच्या न्यासाकडून ठराव करुन मंजुर करण्यात आला.

प्रश्न— तुम्ही किती रक्कम मागितली होती?

उत्तर— मी नेमकी रक्कम मागितलेली नव्हती. आर्थिक सहाय्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे त्यांनी रुपये रोख दहा हजार परत देण्याच्या अटीवर मंजुर केली होती.

मी सदर न्यासाला आर्थिक मदतीची मागणी करत असताना न्यायालयीन कारवाईच्या खर्चाचा अंदाज दिला नव्हता. माझा सदरचा अर्ज मी न्यासाचे त्यावेळेचे सेक्रेटरी गणेश रघुनाथ रेगे यांना दिला होता. त्यावेळेस सदर न्यासाचे अध्यक्ष पी.एम. प्रभु—आजगांवकर असे होते. मी मागणी केलेली रक्कम मला प्रत्यक्षात मिळाली. मला दहा हजार रुपये मिळाले. सदर रक्कम मला धनादेशाने मिळाली. सदर रकमेची परतफेड मी केली. त्याबाबतच्या नोंदी

म्हणजे त्यांनी मला 'ॲडव्हान्स पे' म्हणुन केले होते आणि 'ॲडव्हान्स रिकव्हरी' अशी नोंद देवस्थानाच्या कॅशबुकवर केलेली होती. देवस्थानाने मला धनादेश दिल्याबाबत माझी सही व्हॉवचरवर घेतली होती. देवस्थानला मी सदरची रक्कम परत दिली म्हणुन देवस्थानने मला त्याबाबतची पावती दिली नाही. मी देवस्थानाकडे पावतीची मागणी केली नव्हती. माझेकडे सदर रक्कम परतफेड करण्याबाबत वेगळे असे बंधपत्र अगर लिखीत अभिवचन लिहून घेतले नाही. मला सदर रक्कम फेब्रुवारी २००५ मध्ये देण्यात आली. ती रक्कम मी सप्टेंबर २००५ पर्यंत परत केली. फेब्रुवारी ते सप्टेंबर २००५ या कालावधीमध्ये मी देवस्थानचे लिपीक म्हणुन कार्यरत नव्हतो. सदर रक्कम मी हप्त्या—हप्त्याने रोख स्वरुपात परत केली. मी साधारण ती तीन ते चार हप्त्यात दिली. सदर रक्कम देवस्थानाच्या वतीने तात्कालीक लिपीक वामन दामोदर जोशी यांनी स्विकारली.

प्रश्न— सदर रक्कम परतफेड केल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा म्हणजे सदर देवस्थानाच्या न्यासाच्या किरद मधील नोंद तुम्ही हजर करु शकता का?

(This question relates with regard to proof of collusion as contended by the defendant in his written statement. Whether the plaintiff has onus to produce such documents will be a matter of final argument and appreciation during judgment in line objection taken by ld. Adv. for plaintiff.)

उत्तर— न्यसाजवळ खंड पावत्यांच्या कागदपत्रासंदीर्भात मागणी अर्ज सादर केला होता. सदर मागणी अर्जाची पोहोच माझेजवळ आहे. अर्जासंदर्भात न्यासाचे त्यावेळेसच व्यवस्थापक श्री. पाटकर यांचेकडे अर्जा संदर्भात विचारणा केली असता न्यासाचे लिगल ॲडव्हायझर श्री. बी. एन. प्रभु हे आहेत व तेच काय तो निर्णय घेतील असे खोडसाळ उत्तर दिले.

(सदरचे उत्तर हे विचारलेल्या प्रश्नासदंर्भातील नाही. त्यामुळे ते पुराव्याचा भाग म्हणुन सामिल करणे असे न्यायालयाने मत नोंदविले. मात्र तरीदेखील सदर साक्षीदाराचे उत्तर पुराव्याचा भाग करुन घ्यावे असे प्रतिवादीच्या वकिलांनी आग्रहाने प्रतिपादीत केले. )

उत्तर— दत्पर हे न्यासाच्या पदाधिकारांच्या ताब्यात आहे. त्यामुळे मी त्यांचेकडून अर्ज करुन मागणी करण्याचा प्रयत्न करु शकतो. देणे हे त्यांचे सहकार्यावर अवलंबुन आहे.

१७. पाटकर यांनी मला जे काही उत्तर दिले ते त्यांनी लेखी स्वरुपात द्यावे अशी मागणी मी त्यांच्याकडे केली.

प्रश्न— त्या मागणीप्रमाणे त्यांनी तुम्हाला ताबडतोब लेखी उत्तर दिले का?

उत्तर— त्यांनी मला लगेच तुमचे (बी.एन.प्रभु) नाव सांगितले आणि बी.एन.प्रभु आमचे लिगल

ॲडव्हायझर आहेत तेच याबाबतीत निर्णय घेतील असे सांगितले.

प्रश्न— पाटकर यांनी तसे उद्‌गार काढल्यावर त्यानंतरच्या तारखांना न्यायालयाला त्याबाबत कळवायला काही अडचण होती का?

उत्तर— पाटकारांनी माझेकडे तोंडी स्वरुपात बोलणी केलेली होती. माझेकडे केवळ मी केलेल्या अर्जाची पोहोच होती ती मी माझे वकिलांकडे आणुन दिली.

१८. प्रश्न— तुम्हाला रक्कम देण्याची न्यासाची कृती बेकायदेशीर आहे?

उत्तर— ते न्यासाने ठरवायला हवे.

हे म्हणणे खरे नाही की माझे म्हणण्याप्रमाणे देवस्थानच्या न्यासाकडून आर्थीक सहाय्य घेवून मी त्यांना परतफेड केलेली नाही. मी देवस्थानच्या न्यासाकडून घेतलेल्या रकमेवरील व्याज दिलेले नाही. मी प्रथम केलेल्या मागणीनंतर या दाव्याचे संदर्भात न्यासाकडून पुन्हा आर्थिक सहाय्य मागितलेले नाही. मला प्राप्त झालेल्या दहा हजार रक्कमे व्यतिरिक्त ती रक्कम मिळण्यापुर्वी अगर मिळाल्यानंतर देवस्थानाच्या न्यासाने मला या दाव्यासंदर्भात न्यायालयीन कामकाजासाठी कोणतीही मदत केलेली नाही. वामन दामोदर जोशी यांना साक्षीदार म्हणुन तपासण्याचे आवश्यक असल्यास मी तपासेन. न्यासाने दिलेल्या रक्कमेमधुन माझा या दाव्या संदर्भातील खर्च भागलेला नाही.

१९. हे म्हणणे खरे नाही की न्यासाचे तत्कालीन अध्यक्ष प्रसन्ना महाबळेश्वर प्रभु आणि तत्कालीन सचिव गणेश रघुनाथ रेगे यांचेशी संगनमत करुन मी व त्यांनी न्यासाचे रक्कमेचा अपहार केला. हे म्हणणे खरे नाही की मला दिलेल्या दहा हजार रुपये परतफेड केल्याबाबत मी व उपरोक्त नमुद आसामींनी देवस्थानाच्या न्यासाचे किर्दीमध्ये खोटया नोंदी केल्या. हे म्हणणे खरे नाही की आमच्यात असलेल्या संगनमतानुसार मला याकामी न्यासाकडून दावा जमिनीबाबत बोगस बनावट खंड पावत्या देण्यात आल्या.

२०. दावा जमिनीचे संपुर्ण क्षेत्र आमचेकडे कुळपणास आहे. मी आज जो निशाण २२१ येथे कागद हजर केला त्याची नोंद मला स्वत:ला मान्य आहे. (<u>साक्षीदाराला निशाण २२१ वरील सातबारा दाखविण्यात आला.</u>) माझे म्हणण्याप्रमाणे सदर सातबारावरील पोट खराब्यासहीत संपुर्ण क्षेत्र म्हणजे ३ एकर २२ गुंठे लावणी लायक व २ एकर २६ गंठे पो. ख. इतके क्षेत्र आमचेकडे कुळपणास आहे. (<u>साक्षीदाराला निशाण २२१ वरील सातबारावरील मागील भाग दाखविण्यात आला.</u>) १९५९—१९६० पासुन १९७५—१९७६ पर्यंत कुळपणाला

असलेले क्षेत्र १ एकर २२ गुंठे दाखविण्यात आलेले आहे.

प्रश्न— अशी नोंद तुम्ही हा सातबारा दाखल करण्यापुर्वी तुमच्या निदर्शनास आलेली होती का?

उत्तर— मी सातबारावरील समोरील बाजुवरील नोंद पाहिलेली होती.

त्या सातबारावरील मागील भाग देखील मी पाहिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की मी सादर केलेल्या कागदावर भिस्त ठेवून दावा मिळकतीमध्ये १ एकर २२ गुंठे इतक्या क्षेत्रावर मी कुळपणा प्रतिपादीत करतो. माझे म्हणण्याप्रमाणे संपुर्ण क्षेत्रावरील आम्ही कुळ आहोत अशी नोंद १९८९ सालानंतर आजपर्यंत सातबारावर आहे.

प्रश्न— १९७६ नंतर तुम्ही दावा मिळकतीच्या संपुर्ण क्षेत्राचे कुळ आहात असा निर्णय एखादया कुळकायद्याअंतर्गत सक्षम न्यायालयाने दिलेला ाआहे का?

उत्तर— सदर मिळकतीच्या संपुर्ण क्षेत्रावर सातबाराला कुळ म्हणुन आमची नोंद आहे.

प्रश्न— १९५९—१९६० पासुन १९७५—१९७६ पर्यंत निशाण २२१ वरील सातबारामध्ये कुळपणाला असलेले क्षेत्र १ एकर २२ गुंठे ऐवजी ३ एकर २२ गुंठे इतके क्षेत्र आहे अशी नोंद होण्यासाठी तुम्ही अगर तुमचे पुर्वाधिकारी यांनी कोणते प्रयत्न केले का?

उत्तर— माझे आई वडिलांना सातबाराचे पुर्ण क्षेत्राची माहिती असल्यामुळे त्यांनी तसा अर्ज केलेला नाही.

प्रश्न— निशाण २२१ वरील सातबारामध्ये असणारे पो.ख. चे क्षेत्र २ एकर २६ गुंठे हे तुमच्याकडे कुळपणास होती असे ज्याअर्थी या सातबारावरती नमद नाही त्याअर्थी अशी नोंद करुन घेण्यास तुम्ही काही प्रयत्न केले का?

उत्तर— ज्याअर्थी संपुर्ण क्षेत्रावरती आमचा कुळपणा आहे त्याअर्थी तशी नोंद करण्याचा प्रश्न आला नाही.

माझे वडील १२/०४/१९७८ रोजी मयत झाले. (साक्षीदाला निशाण २१४ वरील कागद म्हणजे खंडाची पावती दाखविण्यात आली.)

प्रश्न— सदर खंड पावतीवर ३ एकर २२ गुंठे व २ एकर २६ गुंठे अशा क्षेत्राचा उल्लेख दिसतो का?

उत्तर— खंड पावतीवर सदर क्षेत्राचा उल्लेख नाही.

(साक्षीदाला निशाण २१५ वरील कागद म्हणजे खंडाची पावती दाखविण्यात आली.)

प्रश्न— सदर खंड पावतीवर ३ एकर २२ गुंठे व २ एकर २६ गुंठे अशा क्षेत्राचा उल्लेख दिसतो का?

उत्तर— खंड पावतीवर सदर क्षेत्राचा उल्लेख नाही.

(साक्षीदाला निशाण २१६ वरील कागद म्हणजे खंडाची पावती दाखविण्यात आली.)

प्रश्न— सदर खंड पावतीवर ३ एकर २२ गुंठे , २ एकर २६ गुंठे आणि १ एकर २२ गुंठे अशा क्षेत्राचा उल्लेख दिसतो का?

उत्तर— खंड पावतीवर सदर क्षेत्राचा उल्लेख नाही.

प्रश्न—निशाण २१४, २१५, २१६ वरील खंड पावत्यांवरील क्षेत्रफळाबाबतची नोंद तुम्हाला मान्य आहे का?

उत्तर— खंड पावत्यांवरील क्षेत्रफळांच्या नोंदी मला मान्य नाहीत.

प्रश्न— तुमच्या म्हणण्याप्रमाणे सदरच्या निशाण २१४, २१५ व २१६ वरील खंड पावतीवरील नोंदी चुकीच्या आहेत का?

उत्तर— खंड पावतीवरील क्षेत्रांच्या नोंदी चुकीच्या दिसत आहेत.

प्रश्न— खंड पावतीमधील रकाना ६ मध्ये जे क्षेत्र नमुद करण्यात आलेले आहे ते तुमच्याकडे कुळपणास चालत नाही असे तुमचे म्हणणे आहे का?

उत्तर— खंड पावतीवरती रकाना क्र. ६ वरती जे क्षेत्र नमूद आहे त्या क्षेत्रासहीत सातबारावरती जे क्षेत्र नमूद आहे ते आमचेकडे कुळपणास चालत आलेले आहे.

प्रश्न— निशाण २१४ ते २१६ या खंडपावत्यांवर नमूद करण्यात आलेले १ एकर सव्वा सहा गुंठे क्षेत्र नेमके कोणत्या जमिनीचे आहे, त्याचा सर्व्हे नंबर हिस्सा नंबर तुम्हाला सांगता येईल का?

उत्तर— देवस्थानच्या मिळकती आमच्याकडे चार सर्व्हे नंबरमध्ये विभागलेल्या आहेत. पैकी सर्व्हे नं. ४१ हिस्सा नं. २, सर्व्हे नं. ४० हिस्सा नं. १२, सर्व्हे नं. ३९ हिस्सा नं. ७ या मिळकती हद्दी सिमा रेषेने एकमेकांना लगत आहेत व सर्व्हे नं. ४० हिस्सा नं. १० ही मिळकत अलग आहे. त्यामुळे लागवडी खालील क्षेत्र आमचे ताब्यात किती आहे हे निश्चीतपणे मला सांगता येणार नाही.

सर्व्हे नं. ४० चा जुना सर्व्हे नं. १७६ आहे. सर्व्हे नं. ३९ चा जुना सर्व्हे नं. १७५ आहे. सर्व्हे नं. ४१ चा जुना सर्व्हे नं. १७७ आहे.

२१. सदर निशाण २१४ ते २१६ या खंडाच्या पावत्यांवर जुना सर्व्हे नं. १७७ नवीन ४१ चा उल्लेख का करण्यात आलेला नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. आमच्याकडे आत्ताचा सर्व्हे नं. ४१ हिस्सा नं. २ कुळपणास आहे. निशाण नं २१४ ते २१६ या खंडाच्या पावत्यांमध्ये जुना सर्व्हे नं. १७७ चा २ म्हणजे नवीन सर्व्हे नं ४१ चा २ नमूद नाही कारण त्या पावत्या देवस्थानाच्या लिपीकाने केलेल्या आहेत त्यामुळे त्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर पावत्यांबाबत मला काहीही माहिती नाही.

२२. सर्व्हे नं. १७६ म्हणजे नवीन ४० हिस्सा नं. १० व १२ हा माझे म्हणण्याप्रमाणे आमच्याकडे कुळपणास आहे. सर्व्हे नं. १७५ म्हणजे नवीन ३९हिस्सा नं. ७ हा माझे म्हणण्याप्रमाणे आमच्याकडे कुळपणास आहे.

प्रश्न— सर्व्हे नं. १७५ चा ७ असा स्पष्ट उल्लेख खंड पावतीवर केलेला नाही?

(निशाण २१४, २१५, २१६ हे कागद खंडाची पावती अशा मजकुराचे दिसतात. त्यामधील रकाना क्र. ४ मध्ये सर्व्हे नंबर नमुद आहे, तर त्याच्याखाली असलेल्या रकाना क्र. ५ मध्ये पो.नंबर, हिस्सा नंबर नमुद आहेत. )

उत्तर— तसा उल्लेख नाही.

**<u>कामकाजाची वेळ झालेने पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/—

दिनांक :— ११/०९/२०१८. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.